PC 5 D:/Regular-17/roshan new shelar/Circular (Pra)

# University of Mumbai

2126

**No. Aff./ICC/ (2018-19)/ / of 2018**

17/1/2019.

परिपत्रक:

विषय:— जैविकविविधता नोंदवही तयार करणेबाबत.

संदर्भ:— महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाचे क्र. मराजैमं/कक्ष—२/विद्यापीठ/३४२/२०१८—१९ दिनांक १३ डिसेबर, २०१८ रोजीचे पत्र.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक तसेच मुंबई विद्यापीठाच्या विविध विभागांचे विभागप्रमूख आणि संचालक यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, सन २००२ मध्ये केंद्र सरकारने राष्ट्रीय जैविक विविधता कायदा पारित केला. हा कायदा तीन तत्वांवर आधारित आहे. १) जैविक विविधतेचे संवर्धन करणे २) जैविक विविधतेचा शाश्वत वापर आणि ३) जैविक विविधता व त्याबाबतच्या ज्ञानाच्या व्यावसायिक उपयोगातून प्राप्त होणा—या लाभामध्ये स्थानिकांची भागीदारी सुनिश्चित करणे. हया कायदाच्या अंमलबजावणीकरिता महाराष्ट्र राज्य जैव विविधता मंडळे स्थापन करण्यात आलेली आहेत. त्याअंतर्गत जैविक विविधतेबद्दल जनमाणसात जनजागृती करणे व स्थानिक जैव विविधतेचे व त्याबद्दल असलेल्या पारंपारिक ज्ञानाचे लोक जैविक विविधता नोंदवही या स्वरूपात नोंदणीकरण करणे, स्थानिक लोकांना बौध्दिक संपदा हक्क (Intellectual Property Rights) व पेटंटचे फायदे मिळवून देणे हा आहे.

त्याअनुषंगाने संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक तसेच मुंबई विद्यापीठाच्या विविध विभागांचे विभागप्रमूख आणि संचालक यांना सुचित करण्यात येत आहे की, जैविक विविधता कायदा, २००२ ची अंमलबजावणी करण्याकरिता लोक जैविक विविधता नोंदवही तयार करण्यात यावी.

13.1.19

(प्रो. सुनिल भिरूड)
प्र—कुलसचिव

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक तसेच मुंबई विद्यापीठाच्या विविध विभागांचे विभागप्रमूख आणि संचालक